# फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

CIN: U45200MH1974SGC017206

पंजि कार्या. : एफडीसीएम भवन, 359/बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर - 440 036.

Website: www.fdcm.nic.in


-----------------------------------------------------------------------------------------------

क्रमांक : विव्य/रोवघ/सीसीटीव्ही/३४३/१७५४ नागपूर, दि. १४/८/२०१७

## एफडीसीएम भवन, नागपूर येथे सीसीटीव्ही कॅमेरा सिस्टीम बसविणेकामी दरपत्रके सादर करणेकामी जाहीर सूचना

विषय :- एफडीसीएम भवन, नागपूर येथील सीसीटीव्ही कॅमेरा सिस्टीम बसविणेकामी दरपत्रके सादर करणेबाबत...

एफडीसीएम भवन, नागपूर येथे सीसीटीव्ही कॅमेरा सिस्टीम बसविणेकामी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. एफडीसीएम भवन, नागपूर येथे खालील १० ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे प्रस्तावित आहेत. आवश्यक असल्यास त्यामध्ये वाढ करण्यात येईल.

| अ.क्र. | तपशिल |
|---|---|
| १ | एफडीसीएम भवनच्या उजव्या बाजुचे मुख्य प्रवेशद्वार |
| २ | एफडीसीएम भवनच्या उजव्या बाजुचे पार्कींग परीसर |
| ३ | जनरेटर संचाजवळ |
| ४ | एफडीसीएम भवनचे मागील प्रवेशद्वार व त्यासमोरील टु व्हीलर पार्कींग व तलावाच्या बाजुचा परीसर |
| ५ | एफडीसीएम भवनची डावी बाजु पॉवर हाऊस व सभोवरचा परीसर |
| ६ | फायर एक्झीट गेट |
| ७ | एफडीसीएम भवनच्या डाव्या बाजूचे मुख्य प्रवेशद्वार |
| ८ | एफडीसीएम भवनचे मुख्य प्रवेशद्वार जवळील २ पीलर |
| ९ | एफडीसीएम भवनच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या आतील पिलर |
| १० | एफडीसीएम भवनचा तळमजला २लिफ्ट व २ जिने परीसर |

त्याकरीता खालील अटी व शर्ती पुरवठा धारकास बंधनकारक राहतील.

१) दरपत्रके सादर करण्यापूर्वी वर नमूद केलेल्या १० ठिकाणाची प्रत्यक्ष पाहणी करावी. सीसीटीव्ही कॅमेराने संपूर्ण परीसर निगराणी खाली राहील ही बाब लक्षात घेवून कोणत्या क्षमतेचे किती सीसीटीव्ही कॅमेरे

बसविणे आवश्यक आहे. याबाबत आढावा घेण्यात यावा व त्यानुसार दरपत्रकामध्ये आवश्यक सीसीटीव्ही कॅमेराचा समावेश करण्यात यावा.

२) सीसीटीव्ही कॅमेरा बसविणे करीता आवश्यक केबलची लांबी याबाबत प्रत्यक्षपणे सर्वेक्षण करून त्यानुसार आवश्यक क्षमतेच्या केबलचा दरपत्रकामध्ये लांबीसह समावेश करण्यात यावा. एफडीसीएम भवन व परीसर मध्ये सीसीटीव्ही कॅमेरा यांची जोडणी करताना संपूर्ण पसरविण्यात येणारी केबल हे संपूर्णत: कन्सिल्ड राहील याची दक्षता घेण्यात यावी. तसेच आवश्यक तेथे अंडरग्राऊंड/ पेवरब्लॉक चे खालून केबलची रचना करावी. कुठल्याही परिस्थितीत केबल बाहेर दिसणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. इमारतीच्या आतील भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसविताना पसरविण्यात येणारी केबल केसींग पट्टीमध्ये बसविण्यात यावी. त्याकरीता आवश्यक ते सर्व साहित्यांचा दरपत्रकात समावेश करण्यात यावा.

३) एफडीसीएम भवन येथे बसविण्यात येणा-या सीसीटीव्ही कॅमेरा करीता आवश्यक यंत्रसामुग्री एफडीसीएम भवनातील ईपीबीएक्स रूममध्ये स्थापित करावयाची आहे.

४) एफडीसीएम भवन येथे बसविण्यात येणा-या सीसीटीव्ही कॅमेराद्वारे देखरेखीकरीता एक ३२" मॉनीटर तळ मजल्यावरील स्वागतकक्ष/अभ्यागत कक्ष व एक ३२" मॉनीटर ४ थ्या माळ्यावरील व्यवस्थापकीय संचालक यांचे कक्षात स्थापन करावयाचे आहे. सीसीटीव्ही कॅमेरेद्वारे देखरेखीकरीता लागणारे २ मॉनीटर एफडीसीएम लि. द्वारे पुरविण्यात येतील.

५) एफडीसीएम भवन येथे बसविण्यात येणा-या सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणेकरीता स्टोरेज क्षमता ही ४TB ची हार्डडीस्क असावी.

६) दरपत्रके सादर करताना आवश्यक सर्व साहित्य ही उच्चतम दर्जेची आयएसआय प्रमाणित असावीत. तसेच दरपत्रकात आवश्यक साहित्याचा तपशील (Specification) देण्यात यावा. तसेच कंपनी/ब्रॅण्ड व वॉरंटी/गॅरंटी याचा ही उल्लेख करण्यात यावा. तसेच दरपत्रके ही सर्व करासह सादर करावेत.

७) सीसीटीव्ही यंत्रणा बसविल्यानंतर त्याचा संपूर्ण यंत्रणेचा साहित्य व मजुरीसह देखभाल ही १ वर्षाकरीता आपणाकडे राहील. त्याकरीता कसल्याही प्रकारचा खर्च एफडीसीएम कडून देण्यात येणार नाही, याबाबतची कुठलीही समस्या उद्भवल्यास आपणास माहिती दिल्यापासून २४ तासाचे आत निवारण करणे बंधनकारक राहील. त्याबाबतचे हमीपत्र स्टॅम्प पेपरवर लिहून द्यावी लागेल.

८) दरपत्रक मंजूर झाल्यानंतर १० दिवसाचे आत दरपत्रकाचे १०% रक्कम सुरक्षा ठेव म्हणून एफडीसीएम लि. कडे डीमांड ड्राफ्टद्वारे जमा करावी लागेल. तसेच हमीपत्र स्टॅम्प पेपरवर लिहून द्यावे लागेल. त्यानंतरच कार्यारंभ आदेश आपणास देण्यात येईल.

९) कार्यारंभ आदेश दिल्यानंतर १० दिवसाचे आत सदर यंत्रणा संपूर्णत: कार्यान्वित करावी लागेल.

१०) दरपत्रके सादर करताना ॲनलॉग हायडेफीनेशन कॅमेरा सिस्टीम व आयपी नेटवर्क कॅमेरा सिस्टीम अश्या दोन सिस्टीमची दरपत्रके वेगवेगळी सादर करावी.

११) दरपत्रके स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार हा व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लि., नागपूर यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे व यावर त्यांचा निर्णय अंतीम राहील.

१२) कामाच्या बिलाचे शोधन कामे समाधानकारकरीत्या पूर्ण झाल्यावर करण्यात येईल. तत्पूर्वी कसल्याही प्रकारचा अग्रीम देण्यात येणार नाही.

१३) कुठल्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास सामंजस्याने तो सोडविण्यात येईल. याबाबत व्यवस्थापकीय संचालक यांचा निर्णय अंतीम राहील.

१४) दरपत्रक सादर करणा-या फर्मचे जीएसटी नोंदणी क्रमांकाची प्रमाणित प्रत दरपत्रकासोबत सादर करावे. अन्यथा त्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

१५) दरपत्रक सादर करताना सादर करणारे फर्मने यापूर्वी सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणा शासकीय/निमशासकीय कार्यालयात बसविण्याचे अनुभव असणे आवश्यक आहे व त्याबाबत दरपत्रकासोबत अनुभव प्रमाणपत्र जोडण्यात यावे.

१६) वरील अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रके दि. २८/०८/२०१७ पर्यंत कार्यालयीन वेळेत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत व्यवस्थापकीय संचालक यांचे कार्यालयातील ४ थ्या माळ्यावर खालील पत्त्यावर सीलबंद लिफाफ्यात स्विकारण्यात येतील. मुदतीनंतर प्राप्त दरपत्रक स्विकारले जाणार नाहीत.

**<u>कार्यालयीन पत्ता :</u>**
**व्यवस्थापकीय संचालक यांचे कार्यालय,**
**फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेड, नागपूर**
**एफडीसीएम भवन ३५९/बी , हिंगणा रोड, अंबाझरी,**
**नागपूर-४४००३६**

-sd-

व्यवस्थापकीय संचालक